॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Phone: (02462) 215294 **EXAMINATION DEPARTMENT** Website: srtmun.ac.in
Fax : (02462) 215572 e-mail: directorboee@srtmun.ac.in

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२४–२५/४८६८ दिनांक : ०५/०६/२०२५

# :: परिपत्रक ::

विषय : प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी–२०२५ च्या सर्व पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांना कमी गुण प्राप्त झाले आहेत असे वाटते, अशा विद्यार्थ्यांचे गुणपडताळणी, उत्तरपुस्तिकेची छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची आवेदनपत्रे भरून घेण्याबाबत.

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये/न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, उपपरिसर किनवट, प्रस्तुत विद्यापीठ, यांना उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी–२०२५ च्या सर्व पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांना कमी गुण प्राप्त झाले आहेत असे वाटते, अशा विद्यार्थ्यांचे गुणपडताळणी, उत्तरपुस्तिकेची छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची तक्रार निवारण (GRM) करण्याकरिता आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

विद्यार्थ्यांना लेखी (थेअरी) पेपरची गुणपडताळणी, थेट/सरळ पुनर्मूल्यांकन (Direct Revaluation), उत्तरपुस्तिकेच्या छायांकित प्रती (Photo Copies) नंतरचे पुनर्मूल्यांकन करता येईल.

१) अ) गुणपडताळणी (व्हेरीफिकेशन) आवेदनपत्राचे शुल्क : रु.७५/– प्रती पेपर
ब) उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत आवेदनपत्राचे शुल्क : रु.३५०/– प्रती पेपर
क) छायांकित प्रतीनंतरचे पुनर्मूल्यांकन आवेदनपत्राचे शुल्क : रु.१५०/– प्रती पेपर
ड) थेट पुनर्मूल्यांकन आवेदनपत्र व शुल्क (सर्व विषयांकरिता) : रु.३५०/– प्रती पेपर
इ) आवेदनपत्रासाठीचे शुल्क : रु.१०/– प्रती आवेदनपत्र

२) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात गुणपडताळणी, उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत व सरळ पुनर्मूल्याकंनांची आवेदनपत्रे सादर करण्याचा अंतिम दिनांक ०९/०६/२०२५ ते १८/०६/२०२५ असून, या तारखेनंतर कुठल्याही परिस्थितीत आवेदनपत्रे महाविद्यालयाने स्वीकारू नयेत व विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांची आवेदनपत्र स्वीकारण्यासाठी शिफारस/अग्रेषित करू नयेत .

३) महाविद्यालयांनी Online पद्धतीने आवेदनपत्रे सादर करण्याचा अंतिम दिनांक १८/०६/२०२५ राहील.

४) महाविद्यालयांनी पुनर्मूल्याकंन शुल्काचा DD/RTGS/NEFT इत्यादीद्वारे सादर करण्याचा दिनांक २०/०६/२०२५ राहील. सदर DD/RTGS/NEFT व आवेदनपत्रे सादर करण्याचा दिनांक २१/०६/२०२५ राहील.

५) महाविद्यालयांनी विद्यापीठाकडून प्राप्त होणाऱ्या उत्तरपुस्तिकांच्या छायांकित प्रती संबंधित विद्यार्थ्यांना त्वरित वितरीत करून सदर छायांकित प्रती प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत विद्यार्थ्यांकडून विहित शुल्कासह (रु.१५०/– प्रती विषय) स्वीकारून ते दोन दिवसात विद्यापीठात सादर करावेत.

६) विद्यार्थ्यांना उत्तरपुस्तिकेची छायांकित प्रत घेतल्यानंतर गुणपडताळणी किंवा थेट पुर्नमूल्यांकन यापैकी एकच सुविधा घेता येईल. याबाबत महाविद्यालयांनी आवेदनपत्रांची छाननी करूनच महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत विद्यापीठात सादर करावेत. कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना विद्यापीठात पाठविण्यात येऊ नये.

७) उन्हाळी–२०२५ परीक्षेपासून विद्यार्थ्यांनी परीक्षा दिलेल्या सर्व विषयांकरिता पुर्नमूल्यांकन करता येईल.

टीप–१) पदवी अभ्यासक्रमांचे निकाल **(OV)** ऑफीस व्हेरीफिकेशनमुळे राखीव असतील, तर अशा विद्यार्थ्यांचे गुणपत्रक संबंधित महाविद्यालयांनी आवश्यक त्रुटींची पूर्तता पूर्ण करून प्राप्त करावीत आणि गुणपत्रक प्राप्त झाल्यानंतर पुर्नमूल्यांकनाची आवेदनपत्रे १० दिवसांच्या आत विद्यार्थ्यांकडून स्वीकारून विद्यापीठात स्वतंत्रपणे सादर करण्यात यावीत.

टीप–२) ज्या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झालेले आहेत, अशा सर्व अभ्यासक्रमांसाठी वर दर्शविलेल्या तारखा व वेळेचे तंतोतंत पालन करण्यात यावे. तसेच ज्या अभ्यासक्रमांच्या गुणपत्रिका प्राप्त झालेल्या नाहीत, अशा सर्व अभ्यासक्रमांच्या गुणपत्रिका विद्यापीठामार्फत लवकरच पाठविण्यात येणार आहेत, अशा सर्व अभ्यासक्रमांच्या गुणपत्रिका प्राप्त झाल्यानंतर १० दिवसांच्या आत पुनर्मूल्यांकनाची **(GRM)** आवेदनपत्रे विद्यार्थ्यांकडून स्वीकारून विद्यापीठात स्वतंत्रपणे सादर करण्यात यावीत.

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव :
मा. कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. प्र–कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव :

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये/न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, यांना देऊन कळविण्यात येते की, पदवी इत्यादी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झालेले असून, त्यापुढील कार्यवाहीसाठी वरील परिपत्रकाप्रमाणे वेळेत कार्यवाही करण्यांत यावी.
२. अधीक्षक/सहा. अधीक्षक, सर्व विद्याशाखा, यांना देऊन कळविण्यात येते की, उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करून त्यासंबंधीचा कार्य अहवाल सादर करण्यात यावा.